# बर्णबाने आपुलकी दाखवली

मुलांना शिकवणाऱ्यानी L4b हा अभ्यास वाचावा.

येशूने आम्हांला इतरांवर प्रेम करा. शत्रूला क्षमा करा आणि आनंदा ने सहकार्य करा अशी आज्ञा केली आहे.

**प्रार्थना:** "प्रिय स्वर्गीय पित्या, तू आम्हांला क्षमा केलीस त्याप्रमाणे आमच्या शत्रूंसह इतरांना क्षमा करण्यासाठी आम्हांला तुझे सामर्थ्य हवे आहे."

1. **इतरांची सेवा नम्रपणे व आस्थेने करण्यासाठी देवाच्या वचनातून तयारी करा.**

**पाहा प्रे. कृ. 4:34-37** मध्ये मंडळीतील गरजु विश्वासणायाऱ्यांसाठी वर्णवाने काय केले?

**पाहा प्रे. कृ. 9:24-27** मध्ये लोकांना शौलाची (यालाचा पुढे पौल म्हटले आहे) भीती वाटली तेव्हा बर्णबाने काय केले.

**पाहा प्रे. कृ. 11:20-30 मध्ये...**

- हलके लेखले गेलेले हेल्लेणी (ग्रीक) लोक ख्रिस्ती झाले तेव्हा बर्णबाने काय केले.
- हेल्लेणी ख्रिस्ती लोकांना अधिक चांगल्या शिक्षकाची गरज होती तेव्हा बर्णबाने काय केले.

**पाहा प्रे. कृ. 15:1-4 मध्ये** परराष्ट्रीय ख्रिस्ती लोकांनी यहूदी चालीरिती स्वीकाराव्यात अशी यहूदी ख्रिस्ती लोकांनी इच्छा व्यक्त केल्यावर पौल व बर्णबाने काय केले.


**पाहा योहान 13:34 व 35** मध्ये येशूने आपल्या सर्व अनुयायांना काय करण्याची आज्ञा केली.

**पाहा मत्तय 20:1-16 मध्ये** आम्ही ख्रिस्तासाठी अधिक खडतर कष्ट केले असतील आणि नवीन विश्वासणाऱ्यां पेक्षा त्याच्यासाठी अधिक दु:ख सहन केले असले तरी त्यांच्याकडे पाहण्याचा आमचा दृष्टीकोन कसा असला पाहिजे

**पाहा 1 करिंथ अध्याय 13 मध्ये**

- आमची कृपादाने आम्ही प्रेमाने आचरणात आणली नाहीत तर त्यांची किंमत काय?
- प्रीती म्हणजे कोणत्या गोष्टी?
- प्रीती म्हणजे कोणत्या गोष्टी नाहीत?
- प्रीती कोणत्या गोष्टी करते?
- प्रीती कोणत्या गोष्टी करीत नाही?

**पाहा लूक 23:33 व 34 आणि प्रे. कृ. 7:58-60** मध्ये येशू व स्तेफन या दोघांनीही काय प्रार्थना केली, त्यावरून विश्वासणाऱ्यांनी आपल्या शत्रूबद्दल काय केले पाहिजे ते समजते.



**पाहा रोम 14:1-5** मध्ये प्रभू येशूची सेवा कशी करावी याबाबत वेगवेगळी मते असणाऱ्यांशी विश्वाणाऱ्यांनी कसे वागावे.

**2. आठवडयातील कार्यक्रमां विषयी तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून योजना आखा.**

जे विश्वासणारे चुका करणाऱ्यांना क्षमा करीत नसतील किंवा त्यांच्याशी कडवटपणे वागत असतील त्यांची नावे लिहा. अशा विश्वासणाऱ्यांनी भेट घेऊन त्यांनी चुका करणाऱ्यांना क्षमा करावी यासाठी प्रार्थना करा.

पुढील प्रकारे बोलणाऱ्या विश्वासणाऱ्यांना तुम्ही हळूवारपणे कसे मार्गदर्शन कराल याची योजना आगोदरच करून ठेवा तशी चर्चा करा.

- "अमुक अमुक व्यक्तीने त्या दुसऱ्याला चांगली नोकरी मिळवून देण्यासाठी मदत केली पण माझ्यासाठी मात्र काही तसे केले नाही"
- "अमुक अमुक व्यक्तीने काही वर्षापूर्वी त्याच्या शिक्षणाने माझा अपमान केला होता त्यामुळे मी त्या मंडळीत परत कधीच जाणार नाही.."
- "अमुक अमुक व्यक्ती ज्या पद्धतीने गटाचे पुढारीपण करते अज्ञानी लोकांना मूर्खासारखे बोलू देते ते मला आवडत नाही."
- "विचित्र उच्चार करून बोलणारे आणि गबाळे कपडे घातलेल्या त्या नव्या लोकांबरोबर राहायला मला आवडत नही."

पौल तिमथी पुढारी प्रशिक्षण अभ्यासक्रम क्रमांक C5e यातून नव्या करारातील "एकमेकां विषयीच्या आज्ञा" एकत्रितपणे वाचा किंवा ह्या अभ्यासाच्या अखेरीस दिलेला सारांश पाहा.

**3. आगामी उपासनेविषयी तुमच्या सहकाऱ्यां बरोबर योजना आखा.**

प्रसंगानुरूप कार्यक्रम निवडा.

भाग 1 मधून बर्णबाच्या जीवनातील काही किंवा सर्व प्रसंग सांगा अथवा ते नाट्यरूपाने दाखवा.

भाग 1 मधील प्रश्न विचारा.

मुलांना त्यांनी तयारी केलेली नाटिका कविता आणि प्रश्न सादर करण्यास सांगा.

नव्या करारातील एकमेकांविषयीच्या आज्ञांची उजळणी करा आणि हया आज्ञा कशा आचरणात आणता येतील याविषयी विश्वासणाऱ्यांना चर्चा करू द्या.

प्रभुभोजनाची ओळख करून देण्यासाठी योहान 6:1-14 मधून येशूने भुकेलेल्या लोकांना अद्‌भुत प्रकारे भोजन दिले तो कथावृत्तांत्त वाचा किंवा सांगा. आजही तो आम्हा विश्वासणाऱ्यांना कशा प्रकारे आध्यात्मिक अन्न आणि पाणी पुरवतो ते स्पष्ट करा.

वेळ उपलब्ध असल्यास कोणाला तरी पुढील किंवा तुमच्या आवडीची कविता वाचून दाखवायला सांगा.

तो दुष्ट त्याचा तिरस्कार जाहिर पणे सांगतो.
यामुळे लौकरच काहूर दाटून येईल!
मनुष्य निराधार निराश्रीत झालेला पाहणे
आणि दु:ख दायक निराशेत बुडालेला पहायला मला आवडते!
मनुष्याने शोकाने आणि दु:खाने टाकलेले उसासे
सैतानाच्या कानाला सुमधुर संगीतच वाटते
त्यांची आसवे पाहून नरकाचा विदुषक हासतो
आणि त्यांचा आनंद लयास गेला की गडगडाटी हासतो

**पाठ करा 1 योहान 13:14**

एकमेकांच्या अपयशाची कबुली देणे, शत्रुसाठी प्रार्थना करणे आणि एकमेकांना प्रोत्साहन देण्याकरीता लहान गट तयार करा.

## नव्या करारातील 'एकमेकांविषयीच्या' आज्ञा

### 1. प्रीती

एकमेकांवर प्रीती करा: योहान 13:34–35; 5:12 व 17; रोम 12:10; 1 थेस्सल 4:9; 1 योहान 3:11,14 व 23; 4:7,11 व 12; 2 योहान 1:5; 1 पेत्र 1:22

नियमशास्त्र पूर्णपणे पाळण्यासाठी एकमेकांवर प्रीती करा: रोम 13:8 आमची एकमेकांवरील प्रीती विपुल व्हावी: 2 थेस्सल 1:3

एकमेकांबद्दलची प्रीती वाढावी: 1 थेस्सल 3:12

एकमेकांवर निष्ठेने प्रीती करा कारण प्रीती पापांची रास झाकून टाकते: 1 पेत्र 4:8

### 2. सहभागिता आणि समेट

एकमेकांबरोबर सहभागिता असावी: 1 योहान 1:7

एकमेकांना क्षमा करा: इफिस 3:13; 4:32; कलस्सै 3:13

पवित्र चुंबनाने (काही संस्कृती मध्ये अलिंगन देऊन) एकमेकांना सलाम करा: रोम 16:16; 1 करिंथ 16:20; 2 करिंथ 13:12; 1 पेत्र 5:14

भाकरी मोडण्यासाठी एकमेकांची वाट पाहा 1 करिंथ 11:33

एकमेकांचे दु:ख सोसा: 1 करिंथ 12:26

### 3. सेवा करा

प्रत्येकाने मिळालेले कृपादान एकमेकांच्या कारणी लावावे: 1 पेत्र 4:10

प्रीतीने एकमेकांची सेवा करा: गलती 5:13

सर्वदा एकमेकांचे चांगले करा: 1 थेस्सल 5:15

एकमेकांची काळजी घ्या: 1 करिंथ 12:25

एक मेकांची ओझी वाहा: गलती 6:2

नम्र सेवेचे प्रतिक म्हणून एकमेकांचे पाय धुवा: योहान 13:14

एकमेकांबरोबर काम करा: 1 करिंथ 3:9; 2 करिंथ 6:1

### 4. शिक्षण द्या

एकमेकांना बोध करा: कलस्सै 3:16

एकमेकांना शिकवण द्या: रोम 5:14

### 5. प्रोत्साहन द्या

एकमेकांना प्रोत्साहन द्या: कलस्सै 3:16; इब्री 10:25

एकमेकांना बोध करा: इब्री 3:13

एकमेकांशी सत्य बोला: इफिस 4:25

एकमेकांसाठी आपला प्राण द्या: 1 योहान 3:16

प्रीती व सत्कर्मे करण्यासाठी एकमेकांना उत्तेजन द्या: इब्री 10:24

### 6. प्रार्थना करा, कबुली द्या आणि उन्नती करा

एकमेकांसाठी प्रार्थना करा: याकोब 5:16

आपली पातके एकमेकांजवळ कबूल करा: याकोब 5:16

एकमेकांची उन्नती (बळकट करा, उभारणी करा) करा: 1 थेस्सल 4:18 आणि 5:1 व 11

स्तोत्रे गाऊन ,शिक्षण देऊन, प्रकटीकरण सांगून, अन्य भाषेत बोलून किंवा तिचा अर्थ सांगून एकमेकांची उन्नती करा: 1 करिंथ 14:26

एकत्रितपणे देवाचे गौरव करा: रोम 15:6

### 7. नम्रपणे ऐक्य साधा

एकमेकांचा आदर करा: रोम 12:10

एकमेकांशी एकचित्ताने राहा: 2 करिंथ 13:11; रोम 12:16; 15:5

एकमेकांवर टीका करू नका: रोम 14:13

एकमेकांवविषयी वाईट बोलू नका: याकोब 4:11; 5:9

एकमेकांच्या आधीन राहा: इफिस 5:21

नम्रतारूपी कमरबंद बांधून एकमेकांची सेवा करा: 1 पेत्र 5:5

### 8. ऐक्याने राहा

एकमेकांशी सहनशीलतेने वागा: इफिस 4:2

एकमेंकांशी शांतीने राहा: मत्तय 9:50

एकमेकांचा आदरातिथ्याने स्विकार करा: रोम 15:7; 1 पेत्र 4:9

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net